# छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-मेट्रो स्थानक भुयारी मार्गाने जोडणार

मुंबई, दि. १२ (प्रतिनिधी) - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि आझाद मैदानात उभारले जाणारे मेट्रो स्थानक भुयारी मार्गाने जोडले जाणार आहे. त्यासाठी सीएसएमटीपासून हिमालय पूल आणि पुढे आझाद मैदान असा तब्बल ३५० मीटर लांबीचा आणि १८ मीटर रुंदीचा सब वे उभारण्याची योजना रेल्वे आणि राज्य सरकारने तयार केली असून त्याचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे. याचा खर्च रेल्वे आणि राज्य सरकार संयुक्तपणे करणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकातून दररोज दहा लाख प्रवासी ये-जा करत आहे. तसेच सीएसएमटीला लागूनच असलेल्या पालिका मुख्यालयासमोरील आझाद मैदानात एमएमआरसीएलकडून मेट्रो-३ अंतर्गत भूमिगत स्थानक उभारण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे येथील प्रवाशांची गर्दी वाढणार आहे. प्रवासी पालिका मुख्यालयासमोरील रस्ता ओलांडून पुढे सीएसएमटी स्थानकात जावे लागणार आहे. त्यामुळे वाहतूककोंडी होण्याची भीती असून प्रवाशांचीही गैरसोय होणार आहे. तसेच सीएसएमटीच्या जागेचा पुनर्विकास रेल्वेकडून सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर रेल्वे जमीन विकास प्राधिकरणाने मेट्रो स्थानक आणि सीएसएमटी स्थानकादरम्यान भुयारी मार्ग उभारण्याबाबत चर्चा केली होती. त्यानुसार मध्य रेल्वे आणि राज्य सरकारची संयुक्त बैठक झाली असून त्यामध्ये प्रशस्त भुयारी मार्ग जोडण्याचा आराखडा तयार केला आहे.